# प्रेसनोट

नाशिक,
दिनांक : १/११/२०१८

**आलोसे कल्पेश शिवाजी गरजे, उच्चस्तर लिपीक, म.रा.वि.वि.कं, ग्रामीण उपविभाग मालेगांव, ता. मालेगांव, जि. नाशिक यांना १५,०००/— रूपये लाचेची रक्कम स्विकारतांना अटक**

---

यातील तक्रारदार यांनी मालेगांव येथे भाडेतत्वावर पॉवरलूम घेतलेले आहे. सदर पॉवरलूमचे चार महिण्याचे लाईट बिल प्रलंबित असून ते कमी करुन देण्यासाठी तक्रारदार यांनी आलोसे कल्पेश शिवाजी गरजे, उच्चस्तर लिपीक, म.रा.वि.वि.क., ग्रामीण उपविभाग मालेगांव, ता. मालेगांव, जि.नाशिक यांची भेट घेऊन विनंती केली असता आलोसे कल्पेश शिवाजी गरजे यांनी सदरचे प्रलंबित लाईट बिल कमी करुन देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे २०,०००/—रुपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, धुळे कार्यालयात तक्रार दिली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीवरुन आज दिनांक ०१/११/२०१८ रोजी ला.प्र.वि. धुळे पथकाने पडताळणी करुन सापळा आयोजित केला असता आलोसे कल्पेश शिवाजी गरजे, उच्चस्तर लिपीक, म. रा.वि.वि.कं, ग्रामीण उपविभाग मालेगांव, ता.मालेगांव, जि.नाशिक यांनी तक्रारदार यांचेकडे २०,०००/—रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती १५,०००/— रूपये लाचेची मागणी केली व सदर लाचेची रक्कम आलोसे गरजे यांनी म.रा.वि.वि. कंपनीचे ग्रामीण उपविभाग, मालेगाव येथील बिलींग विभाग कार्यालयात स्विकारली असता त्यांना पकडण्यात आले आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक तर्फे नागरीकांना आवाहन करण्यांत येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी शासकीय अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्रातील कार्यालयाशी संपर्क साधुन निर्भिडपणे या कार्यालयाकडे तक्रार नोंदवावी.

कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारीबाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल कमांक व दूरध्वनीवर संपर्क साधावा महाराष्ट्रातील सर्व जनतेच्या सोईच्या दृष्टीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्यासाठी **लॅडलाईन ते लॅन्डलाईन व मोबाईल ते लॅन्डलाईन अशी टोल फ्री नंबर १०६४** ची सेवा सुरु करण्यांत आली असुन सदर कमांकावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणालीसंबंधी व करावयाच्या तक्रारीसंबंधी नागरीकांनी संपर्क साधावा.

| अनं | युनिटचे नांव | दूरध्वनी कमांक | **टोल फ्री नंबर** |
|---|---|---|---|
| १ | नाशिक | ०२५३—२५७५६२८, २५७८२३० | **१०६४** |
| २ | अहमदनगर | ०२४१—२४२३६७७ | **१०६४** |
| ३ | धुळे | ०२५६२—२३४०२० | **१०६४** |
| ४ | नंदूरबार | ०२५६४—२३०००९ | **१०६४** |
| ५ | जळगांव | ०२५७—२२३५४७७ | **१०६४** |

पोलीस उपआयुक्त/पोलीस अधिक्षक अँटी करप्शन ब्युरो नाशिक परिक्षेत्र, नाशिक

**( विश्वजीत जाधव )**
वाचक पोलीस उपअधीक्षक
पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक करीता